# जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड
## स्टेशन रोड, नांदेड – ४३१६०१

E-mail : mahnandc@mhstate.nic.in
Telephone No. : 02462 - 234555, **244683** Fax No. : 02462-244682

## निविदा सूचना

याद्वारे कळविण्यात येते की, नांदेड जिल्हा न्यायालयास कार्यालयीन तथा न्यायालयीन दैनंदिन कामकाजास्तव खालील प्रमाणे **प्रिंटर कार्टरेज** आवश्यकतेनुसार वारंवार खरेदी करावी लागते.

| | |
|---|---|
| १ | बहूपयोगी कायोसरा एम– २०४० डिएन प्रिंटर कार्टरेज नविन (Compatible Cartridge) |
| २ | एच.पी १६०६ प्रिंटर कार्टरेज ७८ ए नविन (Compatible Cartridge) |
| ३ | कॅनॉन ६२०० डी व एमएफ ४७५० प्रिंटर कार्टरेज ३२६ ए ३२८ नविन (Compatible Cartridge) |
| ४ | एच.पी. २०२ प्रिंटर कार्टरेज ८८ ए नविन (Compatible Cartridge) |
| ५ | कॅनॉन १५१ डीडब्ल्यू प्रिंटर कार्टरेज ३३७/२८३ नविन (Compatible Cartridge) |
| ६ | एच.पी. एम – २०३ डिएम प्रिंटर कार्टरेज ३० ए चिप सोबत नविन (Compatible Cartridge) |
| ७ | एच.पी. एम – २०३ डिएन प्रिंटर कार्टरेज ३२ ए चिप सोबत नविन (Compatible Cartridge) |

करिता याद्वारे आवश्यक **प्रिंटर कार्टरेज** खरेदीस्तव खालील अटी व शर्तीनुसार स्थानिक बाजारातील इच्छूक पुरवठादारांकडून सीलबंद निवीदा मागविण्यात येत आहेत.

तरी, इच्छूक पुरवठादारांनी **दिनांक २० फेब्रुवारी, २०२४** किंवा त्यापुर्वी कार्यालयीन वेळेत **मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड यांचे नांवे** सीलबंद निविदा या कार्यालयास सादर कराव्यात. तसेच सीलबंद निविदा लिफाफ्यावर **" प्रिंटर कार्टरेज पुरवठा करण्यासाठीची निविदा"** असा उल्लेख करावा.

## लेखानसामग्री / वस्तु / साहित्यांची निवीदा खालील निकष व अटींनुसार मंजूर करण्यात येतील.

- निवीदा दाखल करणाऱ्या इच्छूक पुरवठादाराकडे PAN / GST / सेल्स टॅक्स नंबर असणे आवश्यक असून त्याची स्वसाक्षांकित प्रत निविदेसोबत जोडण्यात यावी.
- निवीदा दाखल करणाऱ्या इच्छूक पुरवठादाराने निविदेसोबत सदरहू **प्रिंटर कार्टरेज** पुरविण्याबाबत शासनाकडून दुकाने व आस्थापनांची नोंदणी अधिनियमांतर्गत प्राप्त दुकानाची/आस्थापनेची नोंदणी असणारे व मुदत दर्शविणारे दस्त सोबत जोडणे आवश्यक आहे.
- प्रत्येक **प्रिंटर कार्टरेज** साहित्यास दर्जानुसार मंजूरी देण्यात येईल. तसेच, किंमत व दर देखील विचारात घेतले जातील.

• पृष्ठ क्र. २ वर ...

- निवीदेतील मंजूर **प्रिंटर कार्टरेज** हे निविदमध्ये नमूद तथा नामांकीत कंपनीचे तसेंच दर्जेदार असावीत.
- पुरवठा करण्यात आलेले **प्रिंटर कार्टरेज** समाधानकारक असल्याची खातरजमा झाल्यानंतरच आपले देयक अदा केले जाईल.
- मंजूर निवीदेतील **प्रिंटर कार्टरेज** नांदेड जिल्हा न्यायालयास पुरवठा कराव्या लागतील, तसेच यासाठी कोणताही वाहतुक व प्रवास खर्च आणि त्यानुषंगीक कोणतेही भत्ते पुरवठादारास अनुज्ञेय असणार नाहीत. तसेच दरपत्रक हे सर्व करांसहीत असावेत.
- मंजूर निवीदेतील **प्रिंटर कार्टरेज** खरेदी आदेश मंजूर पुरवठादास दूरध्वनीद्वारे कळविण्यात येतील, व त्यानुसार तात्काळ पुरवठा करणे बंधनकारक राहील.

- निवीदाधारकास/दरकरारधारकास पुरवठादाराकडून वस्तू पुरवठयानंतर सदरचे उधार मागणी बील प्राप्त झाल्यानंतर खरेदी खर्चाचे देयक उपलब्ध अनुदानानुसार तसेच, कोषागारातुन देयक पारित झाल्यानंतर पुरवठादारास ऑनलाइन अदा करण्यात येईल.
- देयक अदा झाल्यानंतर देयकाची पावती सादर करावी लागेल.
- वस्तूंच्या किंमती व दर्जानुसार एक किंवा एकापेक्षा जास्त पुरवठादारांची निविदा मंजूर केली जावू शकते.
- वस्तूच्या पुरवठयाचे किमान व कमाल प्रमाण जिल्हा न्यायालयाच्या मागणीनुसार राहिल.
- सदरहू करण्यात आलेल्या निवीदेचा / दरकराराचा कालावधी एक वर्षाचा ग्राहय राहील.
- सदरहू निवीदेमध्ये कोणत्याही क्षणी कोणत्याही कारणाशिवाय बदल, दुरूस्ती किंवा सुधारणा करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे.
- सदरहू करण्यात आलेला दरकरार / निवीदा कोणत्याही क्षणी कोणत्याही कारणाशिवाय मंजूर अथवा रद्द करण्याचा संपूर्णत: अधिकार हा या कार्यालयाचा राहील.
- निविदेबाबतच्या विवादासाठी न्यायिक क्षेत्र नांदेड असेल.
- निविदा मंजूरीवेळी आवश्यकतेनुसार व आदेशानुसार सर्व **प्रिंटर कार्टरेजचा** नमुना जिल्हा न्यायालयाच्या खरेदी (मंजूरी) समिती पुढे सादर करावा लागेल.
- तसेच निविदाधारकाची निविदा मंजूरीनंतरही प्रत्यक्ष खरेदी करतेवेळी शासनाच्या GeM Portal वरील दर पाहून GeM वरील दर कमी असल्यास GeM Portal वरुन खरेदी करण्याचे स्वातंत्र्य या कार्यालयास राहिल.

''आदेशावरून''

09-02-2024

**प्रबंधक,**
जिल्हा न्यायालय, नांदेड

जिल्हा न्यायालय, नांदेड }

दिनांक : ०९ फेब्रूवारी, २०२४ }

जा. क्र. / वित्त विभाग /लेसा/ 1633 /२०२४

प्रती,

- अधिक्षक, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, नांदेड यांना सदरहू निवीदा सूचना अग्रेषीत

करण्यात येवून कळविण्यात येते की, त्याची एक प्रत बेलीफामार्फत तात्काळ खालील ठिकाणी देवून / डकविण्यात यावी व मुळ गोषवारा या न्यायालयास परत करण्यात यावा.

१) जिल्हा न्यायालय, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
२) दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
३) मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
४) जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
५) जिल्हा कोषागार कार्यालय, नांदेड यांचे नोटीस बोर्ड.
६) जिल्हा परिषद, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
७) नांदेड वाघाळा महानगर पालिका, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
८) नांदेड मध्यवर्ती बसस्थानक येथील नोटीस बोर्ड

०९.०२.२०२५

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, नांदेड